# राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

डॉ. पी.एस.चव्हाण
एम.बी.बी.एस.डी.पी.एच.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५५५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : sbhivs@pn3.vsnl.net.in

६५७३-७२१० डॉ.नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-१


जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/नावात बदल/ /२००९, दिनांक : ९ सप्टेंबर, २००९

**परिपत्रक महत्वाचे**

प्रति,

१) गटविकास अधिकारी,
पंचायत समिती.....................(सर्व)

२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक,
जन्म व मृत्यु, महानगरपालिका,.....(सर्व)

३) मुख्याधिकारी तथा निबंधक,
जन्म व मृत्यु, नगरपरिषद/नगरपालिका.........(सर्व)

४) व्यवस्थापक, कॅन्टोंमेंट बोर्ड, ....................(सर्व)

विषय :- नावात बदल करण्याबाबत...

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/नावात बदल /८१५३-३३२/२००८, दि. ८ सप्टेंबर, २००८

उपरोक्त विषयास अनुसरुन या कार्यालयाच्या संदर्भिय पत्रान्वये नावात बदल करण्याबाबत सूचना सर्व निबंधकांना पाठविण्यात आलेल्या होत्या. या परिपत्रकातील सूचनाचा योग्य अर्थ न समजल्याने नावात बदलाबाबतची प्रकरणे चुकीच्या अर्थाने निकालात काढण्यात आलेली आहेत. असे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. तरी या बाबत पुढील मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही अपेक्षित आहे.

१) नविन जन्मलेल्या मुलाच्या नावाबाबत सदर परिपत्रक काढण्यात आलेले होते. या मध्ये मुलाच्या नावाची ( वडिलाचे नाव, आईचे नाव, अडनाव याची नाही) नोंदणी झाल्यावर ते नाव संपूर्णतः बदलता येत नाही असे कळविले होते. सदर नविन जन्मलेल्या मुलाचे नाव नोंदविताना कोणतीही औपचारीक चूक झालेली असेल किंवा काही लेखन प्रमादाने चूक झालेली असेल. (उदा. काना, मात्रा, वेलांटी इ.) तर त्यात कलम १५ अनुसरुन बदल करता येतो. परंतु नविन जन्मलेल्या मुलाचे नाव पुर्णपणे बदल करण्याची तरतूद अधिनियमात नाही याची नोंद घ्यावी. (उदा. मूळ नाव रमेश आहे व नंतर महेश ठेवण्यात आले.)

२) आई वडिल यांचे नावात चूक झालेली असेल तर त्या बाबतचे सबळ पुरावे (शासकिय दस्त) सादर केल्यावर निबंधक, त्यांची खात्री पटल्यावर त्याबाबत नोंदवहीतील शेरा रकान्यात याबाबतची नोंद घेवून त्यानुसार प्रमाणपत्र अदा करु शकतो.

३) जर टोपण नावाची नोंद झालेली असेल अथवा माहेरच्या नावाची नोंद झालेली असेल तर त्या बाबतचे सबळ पुरावे संबंधिताने सादर केल्यावर निबंधक कलम १५ व नियम ११(४) च्या अधिन राहून चूक दुरुस्ती करु शकतो.

४) काही वेळेस प्रमाणपत्र घेवून गेल्यावर बऱ्याच वर्षानंतर नावातील चूक दुरुस्ती बाबत अर्ज केले जातात. अशा प्रकरणात सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर तात्काळ याबाबत न कळविण्याची कारणे शोधून काढणे आवश्यक असते. तसेच जुन्या प्रमाणपत्राचा वापर कोणत्या कारणासाठी केला याची चौकशी होणे आवश्यक असते. याबाबत संबंधित निबंधकाची खात्री पटल्यावरच कलम १५ अनुसरुन पुढील कार्यवाही होऊ शकते.

५) समाजाचे नाव, अडनाव म्हणून लावता येत नाही किंवा व्यवसायाचे नाव अडनाव म्हणून लावता येत नाही. तसेच जात, गाव किंवा इतर कोणत्याही बाबीचा उल्लेख अडनावात करता येत नाही. (उदा. बागवान, शिंपी, कोळी, वाणी, तेली, पाटील इ.) जर चुकीने असे झालेले असल्यास त्याबाबतचे पुरावे सादर केल्यावर कलम १५ व नियम ११(४) यास अनुसरुन पुढील कार्यवाही करता येऊ शकते.

६) वरील प्रमाणे चुका, आईवडिलांचे नाव नोंदविताना किंवा अडनाव लिहीताना होण्याची शक्यता असते. अशा चुका योग्य शासकिय पुरावे, प्राप्त झाल्यावर व निबंधकाची त्याच्या सत्यतेबाबत खात्री पटल्यावर त्यात कलम १५ व नियम ११ अन्वये चुक दुरुस्ती करता येऊ शकते.

गटविकास अधिकारी तथा अप्पर जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यु, यांनी आपल्या कार्यक्षेत्रांतर्गत कार्यरत असलेल्या सर्व जन्म व मृत्यु निबंधकास (सर्व ग्रामसेवक) या परिपत्रकाच्या प्रती देण्यात येवून त्यानुसार, कार्यवाही करण्याबाबत कळवावे.

उपसंचालक आरोग्य सेवा<br>
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु<br>
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत माहितीसाठी सादर : मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी :- जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यु, जिल्हा परिषद ..............(सर्व)

२/- जिल्हाअंतर्गत सर्व गटविकास अधिकारी यांच्या प्रती सोबत जोडून आपल्या कार्यालयास पाठविण्यात येत आहेत. या प्रती संबंधित कार्यालयापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपल्या कार्यालयाची आहे याची कृपया नोंद घ्यावी.

F:\83\Circular.doc